# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# भविष्यात ज्याच्याकडे कौशल्य, त्याच्याकडेच संधी–संजीव चव्हाण

वार्ताहर
पाटण

आजच्या काळात पदवीसोबत तुमच्याजवळ कौशल्य असणे अधिक महत्त्वाचे बनले आहे. शिक्षण तुम्हाला उभं करतं, पण कौशल्य तुम्हाला पुढे नेते. त्यामुळे यापुढील काळात ज्याच्याकडे कौशल्य आहे, त्याच्याकडे संधी आपोआप येतील, असे प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी केले.

येथील इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये 'उज्ज्वल भविष्य आणि कौशल्य विकास' विषयावर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. इन्स्टिट्यूटचे प्राचार्य चेतन सावंत, प्रा. भारत कांबळे, प्रा. अमोल चव्हाण, प्रा. समीर संकपाळ आदींसह शिक्षक उपस्थित होते.

संजीव चव्हाण म्हणाले, आज जग झपाट्याने बदलत आहे. नवीन तंत्रज्ञान, नवीन संधी आणि नवीन आव्हाने आपल्यासमोर उभी आहेत. त्यामुळे जो नवनवीन कौशल्य आत्मसात करेल, तोच यशाच्या शिखरावर पोहोचेल. आजच्या युवकांनी केवळ नोकरी मागणारे न बनता, नोकरी देणारे बनण्याचा विचार केला पाहिजे. उद्योजकता, नवीन कल्पना आणि कौशल्य यांच्या जोरावर आपण स्वतःचं आणि देशाचं भविष्य घडवू शकतो. आपल्या प्रत्येकामध्ये एक वेगळे कौशल्य आहे. त्याला ताकद बनवा, असे त्यांनी सांगितले. प्राचार्य चेतन सावंत यांनी प्रास्ताविक केले. प्रा. समीर संकपाळ यांनी आभार मानले.